## प्रकरण १ ले

## आधुनिक मराठी कवितेची वाटचाल

भाषेच्या विकासाबरोबर साहित्याचाही विकास होत असतो. मराठी भाषा आणि साहित्य यांच्या बाबतीत असेच घडलेले दिसते. साहित्यातील महत्वाचा वाङ्मय प्रकार म्हणजे कविता. लोकसाहित्य, संतसाहित्य पंडिती काव्य, शाहिरी काव्य यांच्यापासून अर्वाचीन-पूर्व काळातील मराठी काव्यापर्यंत ही कविता वाटचाल करीत होती. नव्या युगाच्या प्रवेशव्दारापाशी ही कविता पोहोचली तेव्हा वरील सर्व परंपरेचा वारसा तिला मिळाला होता. इंग्रजी अमदानीमुळे तिला नवे परिमाण लाभले. विकासाच्या प्रक्रिया विशेषत्वाने कृतिशील झाल्या. इंग्रजी राजवट सुरू झाल्यावर नव्या युगाची ही कविता, सुरुवातीला ब-याच अंशी संस्कृत व इंग्रजी कवितांची भाषांतरे असे तिचे स्वरूप होते. हळूहळू स्वतंत्र काव्य निर्मितीही होत गेली व आधुनिक काव्याला बाळसे प्राप्त होऊ लागले.

मराठी कवितेचे काव्यदृष्टया चार कालखंड आधुनिक कवितेचे अग्रणी भाष्यकार श्री. रा.श्री.जोग यांनी पाडले आहेत.[१] ते कालखंड पुढीलप्रमाणे आहेत.

| | |
|---|---|
| १) १८४० ते १८८५ | क्रांतिपूर्व काल. |
| २) १८८५ ते १९२० | क्रांतिकाळ |
| ३) १९२० ते १९४५ | रविकिरण मंडळाचे युग |
| ४) १९४५ ते १९६५ | मर्ढेकर युग. |

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

त्याचप्रमाणे प्रा. निशिकांत ठकार यांनी मराठी कवितेचे जे टप्पे पाडले आहेत ते टप्पे पुढीलप्रमाणे आहेत.[3]

१) मराठी कवितेचा पहिला कालखंड ( १८१८ ते १८७५)

२) मराठी कवितेचा दुसरा कालखंड ( १८७६ ते १८८५)

३) मराठी कवितेचा तिसरा कालखंड ( १८८६ ते १९२०)

पूर्वार्ध ( १८८६ ते १९०५)

उत्तरार्ध ( १९०५ ते १९२०)

४) मराठी कवितेचा चौथा कालखंड ( १९२१ ते १९४५)

रविकिरण मंडळ युग १९२१ ते १९३५

काव्यक्रांतीचा पूर्वकाल १९३५ ते १९४५

५) मराठी कवितेचा पाचवा कालखंड (१९४६ ते १९६०)

नवकाव्याचे पहिले प्रवर्तन.

नवकाव्याचे दुसरे प्रवर्तन

नवकाव्याचे तिसरे प्रवर्तन.

६) साठोत्तरी मराठी कविता.

आधुनिक मराठी कवितेचा मागोवा श्री. निशिकांत ठकार यांनी मांडलेल्या या कालखंडांना अनुसरुन घेण्याचे अभ्यासकाने योजले आहे.

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

१) मराठी कवितेचा पहिला कालखंड (१८१८ ते १८७५)

सन १८१८ ला पेशवाई बुडाली व इंग्रजी राज्य प्रस्थापित झाले. इंग्रजी विद्येचा प्रसार होऊ लागला. पूर्वापार चालत आलेल्या प्रवृत्तींचा विलय व नव्या प्रतिभेच्या उन्मेषा अभावी मराठी साहित्यात संस्कृत व

BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

८. इंग्रजी काव्याची भाषांतरे या काळात जास्त होऊ लागली.

संतकाव्य, शाहिरी काव्य व पंडिती काव्य परंपरा अस्त पावत चाललेली होती. संत काव्य तुकारामानंतर क्षीण होऊ लागले होते. पेशवाई बुडाल्यामुळे शौर्य संपले व दैन्यावस्था आली. प्रभाकर व परशराम यांच्यानंतर लावणी व पोवाडा करण्यासाठी वातावरण नव्हते. तसेच त्याचा जनमानसावरचा प्रभावही कमी झाला होता.

पंडिती काव्याची परंपरा त्या मानाने समृध्द होती. पंडिती कवींपुढे प्रचंड ग्रंथनिर्मिती करणाऱ्या मोरोपंतांचा आदर्श होता. मोरोपंतांनी पांडित्याला भक्तीची जोड देऊन टाकली होती. इंग्रजी विद्या शिकलेल्या शास्त्री मंडळींनी इंग्रजी काव्याची भाषांतरे केली. परशुरामपंत तात्या गोडबोले हे पंडित कवींमध्ये श्रेष्ठ कवी. व्यासंगी आणि रसिक. त्यांनी "नवनीत" हा संपादित काव्यसंग्रह प्रसिध्द केला. तसेच "शाकुंतल", "मृच्छकटिक", "उत्तररामचरित", इत्यादी नाटकांची भाषांतरे केली. तसेच प्राचीन कवींच्या काव्यांचे संपादन, नीतिशिक्षणपर कवितांचे लेखन व संस्कृत साहित्यातील अभिजात नाटकांचे मराठीकरण केले. कृष्णशास्त्री चिपळूणकरांनी कालिदासाच्या "मेघदूत" चे भाषांतर केले. त्यांनी "अन्योक्ती" लिहिली. त्यांची कविता रसाळ आहे. गणेशशास्त्री लेले यांनी रघुवंशाचे भाषांतर केले. कृष्णशास्त्री राजवाडे यांनी वर्षभरातील सणांचे वर्णन

SHIVAJI UNIVERSITY KOLHAPUR
BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

करणारे "उत्सव प्रकाश" हे काव्य लिहिले. पां.गो.पारखी यांनी ऋतुसंहाराच्या धर्तीवर "ऋतुवर्णन" लिहिले. बाजीबा प्रधान यांनी स्कॉटच्या Lady of the Lake चे रूपांतर "देवसेनी" (१८६७) असे केले. हे २३५ श्लोकांचे खंडकाव्य आहे. याचे कथानक जयपूरच्या इतिहासावर घेतले आहे. कवितेची भाषा भावानुगामी व रसार्द्र आहे. पांडुरंग व्यंकटेश चिंतामणीपेठकर यांनी "गंगावर्णन" (१८७४) लिहिले. दक्षिणा प्राईझ कमिटीने "गंगेचे वर्णन" या विषयावर काव्ये मागवली त्यांत चिंतामणी पेठकर यांच्या "गंगावर्णन" ला बक्षीस मिळाले.

स्वतंत्र काव्यरचनेचा या काळातील महत्त्वाचा प्रयोग म्हणजे म.मो.कुंटे यांचे महाकाव्य "राजा शिवाजी" हे होय. "राजा शिवाजी" च्या रूपाने मराठीत वीररसप्रधान काव्य निर्माण झाले. संस्कृतनिष्ठ, अभिजातवादी, पुणेरी पंडितांचा आदर्श त्यांनी मोडला. त्यांच्यावर टीका झाली. उच्चारानुसारी त्यांनी लेखन केले. दूरान्वय, अर्थसंदिग्धता, यतिभंग, विसंगत वर्णन इत्यादि दोष या काव्यात आहेत. असे असले तरी स्वतंत्र काव्यदृष्टीने काव्य लिहिणारा या काळातील एकमेव कवी म्हणजे म.मो.कुंटे हे होत.

अर्वाचीन मराठी काव्याच्या आरंभयुगात परंपरेने चालत आलेले संतकाव्य, शाहिरी काव्य, पंडिती काव्य या परंपरा क्षीण होत गेल्या. पंडिती काव्याने भाषांतराद्वारे आपले अस्तित्व टिकवून धरले; पण स्वतंत्र काव्यरचनांद्वारे व इंग्रजी भाषांतराद्वारे काव्याच्या नव्या युगाचे संसूचन होऊ लागले.

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

## मराठी कवितेचा दुसरा कालखंड (१८८५ ते १९२०)

या कालखंडात युगसंक्रमणाचे स्वरूप अधिक स्पष्ट झाले. इंग्रजी
काव्यातील साधेपणाचे सौंदर्य, नाविन्य, वैचित्र्य, निर्यमकत्व यांचे
आकर्षण वाढीस लागून पंडितीकाव्याचे संस्कृत आदर्श मागे पडू लागले.
ऐतिहासिक, उपदेशपर व प्रासंगिक स्वरूपाची स्वतंत्र कविता लिहिली जाऊ
लागली. का.र.कीर्तिकरांनी टेनिसनच्या "प्रिन्सेस"चे रूपांतर "इंदिरा"
असे केले. या काव्यामध्ये त्यांनी स्त्री वरील अन्यायाचा निषेध करणारी
व स्त्री स्वातंत्र्याचा पुरस्कार करणारी नायिका रंगविली आहे. आत्मगत
भावनांचा उत्कट आविष्कार करणारे त्यांचे आणखी एक काव्य म्हणजे
"विलापलहरी" हे त्यांनी स्वपत्नीनिधनावर लिहिलेले काव्य आहे.

वि.मो. महाजनी यांच्या "कुसुमांजली" ने प्रथम स्फुट
स्वरूपाची भावकाव्यपर रचना प्रस्तुत केली. "कुसुमांजली" १८८६ मध्ये
प्रसिध्द झाली. आशयदृष्टया नवीन विषय व नवी दृष्टी यांचा स्पर्श
मराठी काव्याला त्यामुळे झाला. कवितेच्या नव्या आशयक्षेत्राचा दिशा-
संकेत "कुसुमांजली" ने दिला. कीर्तिकरांनी वृत्तबंधन शिथिल करण्याचा
प्रयत्न केला. तसाच महाजनींनी अर्धसम वृत्ताचा प्रयोग करून पाहिला.
मराठी कवितेची जातिरचनेकडे होणारी वाटचाल त्यातून सूचित होते.
गो.वा. कानिटकर यांनी इंग्रजीतून रूपांतरीत केलेल्या गीतिकाव्यांना
वृत्तबंध न करता नाटकाच्या पदांच्या चाली दिल्या आहेत. हे विशेष
उल्लेखनीय आहे. याच काळात किर्लोस्कर-देवलांची "सौभद्र", "शाकुंतल"
मधील पदे लोकप्रिय झाली.

SHIVAJI UNIVERSITY विशेष LIBRARY KOLHAPUR
BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

क्रांतिपूर्व व संक्रमण अवस्थेतील मराठी कवितेचे स्वरूप लक्षात घेतले तर एक गोष्ट जाणवते ती म्हणजे गद्याच्या वाढत्या प्रयोगामुळे पद्यावरचे ओझे कमी होऊन त्याचे क्षेत्र विशिष्ट होऊ लागल्याचे दिसते. त्यामुळे कवितेच्या आंतरिक शक्तीच्या विकासाला अवसर प्राप्त झाला. काव्यभाषेतील जुनाटपणा जाऊन ती नवे रूप धारण करू लागली. अभिव्यक्तीप्रमाणेच आशयक्षेत्रातही बदल घडून आले. गीतिकाव्याचे बीजारोपण झाले व त्यातूनच पुढे खऱ्या मराठी कवितेचा विकास झाला. सामाजिक, राजकीय, ऐतिहासिक, निसर्गवर्णनपर काव्य लिहिले जाऊ/ऐ लागले.

१८८५ नंतर मराठी कवितेच्या क्षेत्रात झालेल्या क्रांतीची ही पूर्वचिन्हे आहेत. या काळातील कविता काव्यदृष्टया सामान्य दर्जाची असली तरी क्रांतीचे वारे कोणत्या दिशेने वाहणार याचा संकेत या कालखंडातील काव्यामधून मिळतो.

## मराठी कवितेचा तिसरा कालखंड १८८६ ते १९२०

पूर्वार्ध (१८८६ ते १९०५ )
उत्तरार्ध (१९०६ ते १९२० )

१८८६ ते १९२० हा मराठी कवितेचा क्रांतिकाल. कवितेचे आत्मलक्षी स्वरूप या काळातच सिद्ध झाले. अभ्यासाच्या सोयीसाठी या कालखंडाचे दोन भाग केले आहेत.

१८८६ ते १९०५ आणि १९०६ ते १९२०

## पूर्वार्ध - (१८८६ ते १९०५)

१८८६ ते १९०५ या कालखंडात विठ्ठल भगवंत लेंभे, गणेश

जनार्दन आगाशे, मोरो गणेश लोंढे, वासुदेव वामन खरे, राधारमण (कृष्णाजी पांडुरंग लिमये), गंगाधर रामचंद्र मोगरे, केशवसुत, (कृष्णाजी केशव दामले), रेव्हरंड नारायण वामन टिळक, विनायक (वि.ज. करंदीकर) माधवानुज, (काशिनाथ हरी मोडक), दत्त (दत्तात्रय कोंडो घाटे ) या कवींनी काव्यलेखन केले.

संस्कृत काव्याचा आदर्श विठ्ठल भगवंत लेंभे (१८५०-१९२०) यांच्यापुढे होता. संस्कृतप्रचुर असूनही क्लिष्ट नसण्याचा चमत्कार त्यांच्या प्रसन्न शैलीमध्ये दिसून येतो. "सुरतरंगिणी" नावाचे अद्भुतरम्य पण सामान्य काव्य त्यांनी लिहिले.आहे. कृष्णशास्त्री चिपळूणकर व ए.ग. भांडारे यांच्या निधनावर त्यांनी अनुक्रमे "विष्णुनिधन" व "एकनाथ वियोग" ही दीर्घ काव्ये लिहिली. आत्मानुभूतीप्रधान असे "शोकावर्त" काव्यही त्यांनी लिहिले. या काव्यात पत्नीवियोगामुळे झालेल्या शोकाचे वर्णन परिणामकारक केले आहे.

गणेश जनार्दन आगाशे (१८५२ ते १९१९) यांनी "बाष्पांजली" हे काव्य लिहिले. हे काव्य मंदाक्रांता वृत्तात असून या काव्यात करुण रसाचा परिपोष करता करता विलापिकेच्या लक्षणाला अनुसरून कवीचा अनुभव तत्वचिंतनात परिणत होतो.

मोरे गणेश लोंढे (१८५४-१९२०) यांनी "बोधामृत", "बोधशतक", "बोधसुधा" या कविता लिहिल्या. त्यांची कविता कोणत्याही विषयातून तात्पर्यनीतीचा उपदेश बाळबोधपणे व ढोबळपणे आविष्कृत करते.

~~[illegible]~~.

वासुदेव वामन खरे (१८५८-१९२४) यांनी "समुद्र", "मृत्यु", "उज्जयिनि", "जन्मभूमी", गोपिकाबाईंचा पुत्रशोक व यशवंतराय इत्यादी काव्यरचना केली. रसाळ भाषा हे खरे यांच्या काव्याचे वैशिष्ट्य आहे.

राधारमण (कृष्णाजी पांडुरंग लिमये)(१८७७ - १९२७) यांनी टिळकांच्या बंदिवासावर "आर्यमाताविलाप" हे काव्य लिहिले. या काव्यात संस्कृतप्रचुरता व पांडित्य आढळते. जुन्या शैलीत नव्या विषयावर त्यांनी रचना केली.

अनंततनय (दत्तात्रय अनंत आपटे) (१८७९-१९२९) "श्रीराम तिलक विजयम्" नावाचे ओवीबद्ध टिळकचरित्र त्यांनी लिहिले. ऐतिहासिक, राष्ट्रीय, विनोदी इत्यादी प्रकारची कविता त्यांनी लिहिली. "हृदयतरंग" मध्ये त्यांची कविता संकलित आहे.

गंगाधर रामचंद्र मोगरे(१८५८-१९१५) यांची कविता "मोगऱ्यांची फुले" या नावाने प्रकाशित झाली आहे. विलापिका आणि उपहासिका प्रामुख्यांनी त्यांनी लिहिल्या.

केशवसुत (कृष्णाजी केशव दामले) (१८६६-१९०५) अर्वाचीन मराठी काव्यामध्ये केशवसुतांचे स्थान अटळ आहे. त्यांनी मराठी कवितेला अलौकिकाकडून लौकिकाकडे, वस्तुनिष्ठतेकडून - आत्मनिष्ठतेकडे, दीर्घतेकडून - स्फुटतेकडे व अस्पष्ट बाह्य जाणिवांकडून सुस्पष्ट काव्य-

दृष्टीकडे वळविले, म्हणून त्यांना आधुनिक मराठी कवितेचे जनक म्हणतात. सुनीतरचना, गूढगुंजनाची प्रवृत्ती, सामाजिक आशय, प्रणयभावनेचे नवे रूप, निसर्गविषयक नवा दृष्टीकोन, या सर्व प्रकारात असणारा स्फुट मुक्तपणा हा मुख्यत: इंग्रजी कवितेच्या संपर्कामुळे आला आहे. आधुनिक मराठी कवितेतील सारे प्रवाह केशवसुतांच्या कवितेपासून सुरू झालेले दिसतात. राष्ट्रीय कविता (निशाणाची प्रशंसा), सामाजिक कविता (नवा शिपाई, तुतारी) गूढगुंजनपर कविता (झपूर्झा) कवी विषयक कविता (आम्ही कोण ?) प्रेमविषयक कविता (प्रत, प्रीती, फारा दिवसांची भेट) कुटुंबविषयक कविता (गोष्टी घराकडील, स्मृती, ) निसर्गविषयक कविता (भृंग, पुष्पाप्रत) सुनीत (मयुरासन आणि ताजमहाल) हे सर्व प्रवाह त्यांच्या कवितेपासून सुरू झाले. काव्याला चिंतनपूर्वक नवी दिशा, नवी वाट देण्याचे ऐतिहासिक कार्य त्यांनी केले. कवितेसंबंधी चिंतन व वेगवेगळे प्रयोग त्यांनी केले. सुनीत रचनेत विविध प्रयोग करून धीरगंभीर शार्दूलविक्रीडित वृत्त त्यांनी शोधले. मात्रावृत्ता- वृत्तमध्ये कविता बांधल्या. यमकांची नवी जुळवाजुळव केली. या प्रयोगापलिकडे त्यांच्या कवीमनाचा विचार केला तर असे दिसते की, त्यांना कवितेचाच ध्यास होता. तो केवळ कवितेच्या रचनेमध्ये विविधता आणण्यापुरता मर्यादित नव्हता. कविता आशयदृष्ट्याही समृद्ध व्हावी असे त्यांना वाटत होते. "आम्ही कोण ?" सारख्या कवितेत आपणास त्याची जाणीव होते. त्यांना स्वत:च्या कवित्वाविषयी जाणीव होती. तसेच काव्यशक्तीची अधिक जाण होती.

केशवसुतांनी कवितेवरील प्रेमामुळे काव्यदेवतेवर प्रीतिदेवतेचे रूपक केले व "पिंपर्यांद", "रुष्ट सुंदरीस", "थकलेल्या भटकणाराचे गाणे" या सारख्या कविता लिहिल्या. यावरून त्यांचे प्रेमभावनेपेक्षा प्रेमकल्पनेवरच अधिक प्रेम असल्याचे जाणवते. "प्रीती", "मयूरासन आणि ताजमहाल" या कविता सूक्ष्मतरल व विशुध्द प्रणयभावनेचा आत्मनिष्ठ भावोद्गार व्यक्त करणाऱ्या कविता आहेत. या कविता पूर्वीच्या स्थूल व संस्कृत-निष्ठ शृंगारातून बाहेर पडल्या आहेत. म्हणून केशवसुतांनी प्रेम - कवितांचा युगारंभ केला, असे म्हटले पाहिजे.

निसर्गाकडे मुक्तपणे पाहण्याची दृष्टी केशवसुतांनी मराठी कवितेस दिली. "सृष्टि आणि कवि", "भृंग", "पुष्पापृत", "फुलपाखरू" इत्यादि कवितांमध्ये निसर्गातून स्वतःला पाहण्याचा त्यांचा आत्मनिष्ठ आविष्कार असल्यामुळे या कवितांकडे निसर्गनिष्ठ कविता या दृष्टीने पाहणे योग्य नाही. जुन्या कवितेतील अलंकारिक व आनुषंगिक निसर्गाला केशवसुतांनी नव्या दृष्टीचा चैतन्यस्पर्श दिला. केशवसुतांच्या सामाजिक कवितेत त्यांची सामाजिक जाणीव जागृत आणि प्रस्थापितांशी विद्रोह करणारी आहे. "अंत्यजाच्या मुलाचा पहिला प्रश्न" "मजुरावर उपास-मारीची पाळी", "एका भारतीयाचे उद्गार" या सारख्या कवितांमधून अस्पृश्यता , आर्थिक विषमता, राजकीय पारतंत्र्य इत्यादि समकालीन सामाजिक प्रश्नांचा आढावा त्यांनी घेतल्याचे दिसते. "तुतारी", "स्फूर्ती" "नवा शिपाई" या कवितांमध्ये केशवसुतांचा आवेश, संताप, चीड व प्रक्षोभ आणि त्यातील प्रामाणिकपणा अंतर्भेदी आहे. "तुतारी" म्हणजे अर्वाचीन मराठी कवितेतील एक अमर क्रांतिगीत आहे. त्यांची सामाजिक

जाणीव वस्तुस्थितीपासून आदर्शापर्यंतचे अनुभव आत्मनिष्ठेने व्यक्त करते. केशवसुतांचे गूढगुंजन संतांच्या आत्मसाक्षात्कारासारखे नसले तरी आंतरप्रतीची धर्मांचे निश्चित आहे. "कोणीकडून ? कोणीकडे ?", "झपूर्झा", "हरपले श्रेय" ह्या काही गूढगुंजनपर कविता आहेत. या कवितांमध्ये जीवनातील अंतिम रहस्याचा शोध ते स्वानुभूतीने घेतात. तर कधी वेदनापूर्ण निराशेचे गाणे गातात. त्यांच्या साध्या विषयात मोठा आशय पाहणाऱ्या कविता म्हणजे "दवाचे थेंब", "सतारीचे बोल", "दिवस आणि रात्र", "विद्यार्थ्यांप्रत" ह्या होत. त्यांच्या शब्दात लालित्यापेक्षा धाग अधिक आहे. "क्लृप्ती"चा उत्प्रेक्षेचा केशवसुतांचा प्रयोग हा एक वेगळयाच भाषासामर्थ्याचा प्रत्यय देतो.

केशवसुतांच्या काव्यात काही दोष आढळतात. ओबडधोबड भाषा, क्लिष्टता, गद्यात्मकता, अपरिचित शब्दप्रयोग, इंग्रजी वाक्प्रचारांची छाप, दूरान्वितता, छंदभंग, माधुर्याचा अभाव, इत्यादि दोष त्यांच्या भाषाशैलीत दिसून येतात. हे खरे असले तरी त्यांच्या प्रभावी कवित्वशक्तीला बाधा येत नाही. बहिर्मुख आणि अंतर्मुख प्रवृत्ती, धूसरता आणि उज्वलता, आशा आणि निराशा, आत्मविश्वास आणि व्याकुळता, उद्दामपणा आणि लीनता, लौकिक आणि अलौकीक या सारख्या द्वंद्वांचा उच्चार करणारी केशवसुतांची कविता आहे. या कवितेनेच द्वंद्वा पुढे केशवसुत संप्रदाय निर्माण केला.

केशवसुत समकालीन कवी :-
===================

रेव्हरंड नारायण वामन टिळक (१८६१-१९१९) हे "फुलामुलांचे कवी" म्हणून ओळखले जातात. त्यांनी ख्रिस्ताला "अभंगांजली" ह्या

अर्पण केली आहे. "ख्रिस्तायन" हे त्यांचे अपूर्ण काव्य त्यांच्या पत्नी प्रसिद्ध साहित्यिक लक्ष्मीबाई टिळक यांनी पूर्ण केले. "भजनसंग्रह" तसेच स्फुट कवितांबरोबर "टिळकांची कविता भाग १ ते ४" हे काव्यसंग्रह विशेष उल्लेखनीय आहेत. टिळकांची कविता साधी, निर्मळ, निकोप आहे. त्यांची प्रेमकविता सोज्वळ आणि उदात्त आहे. त्यांच्या कवितेत नव्या सौंदर्यवादी परंपरेच्या खाणाखुणा आहेत; पण त्याहून जास्त वास्तववादाच्या जाणीवा आहेत.

विनायक (वि.ज.करंदीकर) (१८७२ - १९०९) यांनी आधुनिक राष्ट्रीय कवितेचा प्रारंभ केला. विनायकांच्या कवितेत भावनांची उत्कटता आणि तीव्रता आहे. "निःशमा", "स्वप्न" ह्या विनोदी कविता तर "शिवसंदेश", "शिवराजदर्शन", "महाराष्ट्र लक्ष्मी" या सारखी राष्ट्रीय भावना व्यक्त करणारी कविता तसेच "अहिल्या", "पद्मिनी", "राणी दुर्गावती", "संयोगिता", "तारा", "कृष्णाकुमारी" "वीरमती" या कवितांमधून त्यांनी भारतीय स्त्री जीवनाचा उदात्त आदर्श सर्वांपुढे ठेवला आहे. त्यांच्या काव्यशक्तीचे सामर्थ्य संकुचित वाटते. तरीसुद्धा देशभक्ती हा महत्त्वाचा गाभा त्यांच्या काव्यात आहे. विनायकांची कविता बोधवादी, कथाकाव्यात्मक व बाळबोध आहे. पहिले राष्ट्रीय कवी म्हणून त्यांचे नांव घेतले जाते.

माधवानुज (काशिनाथ हरी मोडक १८७२-१९१६) हे "बोधकवी" आहेत. ते विविध विषय हितोपदेशक बनून मांडतात. सोपा आशय साध्या भाषेत सरळ रचनेत माधवानुज गुंफतात. त्यांनी रवींद्रनाथ टागोरांच्या "गीतांजली" चा अनुवाद केला. सुनीत रचनाही त्यांनी

केल्या; पण त्यात नवक्रांतीची ओढ जाणवत नाही. साधेपणाचे सौंदर्य त्यांच्या कवितांमध्ये आढळते. भावनिक गुंतागुंतीचा अभाव व बोधवादाची छाया माधवानुजांच्या काव्यावर आढळते.

बालकांचे कवी म्हणून दत्त (दत्तात्रय कोंडो घाटे १८७५-१८९९) हे ओळखले जातात. त्यांची प्रेमकविता विविध छटांची असली तरी त्यांत निराशेचा प्रभाव अधिक दिसून येतो. बालमनाची जाण त्यांना होती. दत्त यांच्या बालकवितांत रम्य प्रसन्नता व ऋजुता आढळते. "श्री.शिवछत्रपती", "भगवा झेंडा" या कविता प्रचलित राष्ट्रीयवादाच्या प्रभावामुळे त्यांनी लिहिल्या. परंतु वात्सल्य हाच त्यांच्या कवितेचा गाभा असल्याचे दिसते.

## मराठी कवितेचा तिसरा कालखंड उत्तरार्ध (१९०५ ते १९२०)

मराठी कवितेच्या तिसऱ्या कालखंडाच्या उत्तरार्धात गोविंदाग्रज (राम गणेश गडकरी १८८५-१९१९), बालकवी (त्र्यंबक बापूजी ठोंबरे), एकनाथ पांडुरंग रेंदाळकर, लक्ष्मीबाई टिळक, चंद्रशेखर (चंद्रशेखर शिवराम गोऱ्हे), बी (नारायण मुरलीधर गुप्ते), भास्कर रामचंद्र तांबे, विनायक दामोदर सावरकर, गोविंद (गोविंद त्र्यंबक दरेकर) या कवींच्या कविता प्रकाशित झाल्या.

गोविंदाग्रज (राम गणेश गडकरी १८८५-१९१९) यांचा "वाग्वैजयंती" हा कवितासंग्रह मरणोत्तर प्रकाशित झाला. केशवसुतांच्या "तुतारी" प्रमाणे "दसरा" व "झपूर्झा" प्रमाणे "मुरली" या कविता त्यांनी लिहिल्या. त्यांना "प्रेमाचे शाहीर" म्हटले जाते. "चिंतातुर जंतू"

"हुकमेहुकूम" ह्या त्यांच्या विनोदी कविता आहेत. प्रेम हाच त्यांच्या कवितेचा प्रमुख विषय आहे. त्यांची भावना प्रकटीकरणाची शक्ती प्रभावशाली आहे. जुन्याची ओढ व नाविन्याचे आकर्षण त्यांच्या ठायी आढळते.

"बालकवी" (त्र्यंबक बापूजी ठोंबरे १८९०-१९१८) यांना १९०७ साली अहमदनगर येथे संमेलनाध्यक्ष कीर्तीकर यांनी "बालकवी" ही उपाधी दिली. केशवसुतांच्या "तुतारी"चे अनुकरण करणारी "धर्मवीर" ही कविता त्यांनी लिहिली, पण त्यांची प्रतिभा निसर्गाच्या सहवासात अधिक रमते. त्यांच्या कवितेत निसर्गाचे नुसते चित्र नसते, तर निसर्ग मानवी भावना मूर्त स्वरूपात आविष्कृत करतो. त्यांनी "प्रेमलेख", "जादुगरणीला" या प्रेमकविता लिहिल्या आहेत. तसेच "चांदोबा मजला देई", "रागोबा आला" या बालकविता लिहिल्या आहेत. "औदुंबर", "श्रावणमास", "फुलराणी" या त्यांच्या काही महत्वाच्या कविता. निसर्गातील सौंदर्योत्सव पाहून त्यांच्यातील कवी बेहोश होतो. बालकवींनी निसर्गसौंदर्याचे विविध पैलू उलगडून दाखविले.

बंगाली गीते एकनाथ पांडुरंग रेंदाळकरांनी (१८८७-१९२०) मराठीत आणली. त्यांच्या गूढ गुंजनाचा सूर केशवसुतांपेक्षा रवींद्रनाथ टागोरांच्या कवितेशी अधिक जुळतो. "अजुनि चालतोचि वाट" ही त्यांची उत्कृष्ट कविता. रेंदाळकरांचे काव्याच्या दृष्टीने महत्वाचे काम म्हणजे निर्यमक रचना होय. काव्यरूढी मोडण्याचा त्यांनी प्रयत्न केला.

लक्ष्मीबाई टिळक (१८७३-१९१६) या एकमात्र उल्लेखनीय कवयित्री मराठी कवितेच्या तिस-या कालखंडाच्या उत्तरार्धात होऊन गेल्या. "लक्ष्मीबाईंचा कवितासंग्रह "भरली घागर" नावाने प्रसिद्ध आहे. नारायण वामन टिळक हे त्यांचे पती. पतीचे अपुरे "ख्रिस्तायन" १२ ते ७५ अध्याय लक्ष्मीबाईंनी पूर्ण केले. साधी व सुगम शैली तसेच घरगुती व प्रसन्न भावनांचे दर्शन त्यांच्या काव्यात दिसते.

चंद्रशेखर (चंद्रशेखर शिवराम गो-हे १८७१-१९३७) यांची कविता वस्तुनिष्ठ, वर्णनप्रधान व निवेदनात्म आहे. त्यांनी मिल्टनच्या ________________ या अद्भुत कथेवर "काय हो चमत्कार" हे काव्य लिहिले. हे काव्य मराठीतील अभिजात कथाकाव्य आहे. चंद्रशेखरांच्या काव्यात उदात्तता, औचित्यपूर्णता व अप्रतिम रचनाचातुर्य आहे; पण प्रगमनशील वैचारिक आशय कमी आहे. त्यांच्या काव्यात अभिजातवादाचे शुद्ध रूप दिसते.

बी. (नारायण मुरलीधर गुप्ते १८७२-१९४७) यांच्या "फुलांची ओंजळ", "पिकलं पान" या काव्य संग्रहात एकूण ४९ कविता आहेत. "डंका" "चाफा", "वेडं गाणे", "कमळा" ह्या त्यांच्या विशेष प्रसिद्ध कविता. त्यांच्या कविता एका चिंतनशील, रसज्ञ तत्वज्ञाच्या वाटतात. त्यांच्या सर्व कवितांना उदात्त आणि धीरगंभीर आशावादाचे अधिष्ठान लाभलेले आहे.

भास्कर रामचंद्र तांबे १८७३-१९४१ यांची कविता "तांबे यांची समग्र कविता" या काव्यसंग्रहात एकत्रितपणे आहे. विशुद्ध

कलावादी, सौंदर्यप्रेमी व गूढरम्यवादी गीतिकाव्याचे अध्वर्यू म्हणून तांबे ओळखले जातात.

विनायक दामोदर सावरकर(१८८३-१९६६) महाकाव्य न लिहिलेला महाकवी असा त्यांचा गौरव करण्यात येतो. सावरकरांची कविता आत्मनिष्ठ न होता आत्मचरित्रपर होऊन जाते. त्यांनी "चापेकरांवरील फटका". सिंहगड" हे पोवाडे लिहिले. "भगवती", "तारकास पाहून","जगन्नाथाचा रथोत्सव" "सागरास", "आत्मबल", "प्रभाकरास", "भगवती" हे स्वतंत्रतेचे स्तोत्र आहे. तर "सागरास" ही भावनोत्कट कविता आहे. "कमला", "गोमंतक" ही अपुरी खंडकाव्ये आहेत. त्यांनी विविध प्रकारची कविता लिहिली आहे. ओजस्वी व संस्कृतप्रचुर भाषा, व्यापक जीवनानुभव, उत्कट ध्येयवाद ही त्यांच्या काव्याची वैशिष्टये आहेत.

मराठी कवितेचा चौथा कालखंड ( १९२१-१९४५)

१) रविकिरण मंडळ युग १९२१-१९३५
२) काव्यक्रांतीचा पूर्वकाल १९३५- १९४५

१९२० ते १९२३ च्या दरम्यान पुण्यात अभ्यासाच्या वा व्यवसायाच्या निमित्ताने वास्तव्य करीत असलेले कांही तरुण कवी रविवारी चहापानासाठी एकत्र जमून काव्यचर्चा करु लागले. याच कवींनी "रविकिरण मंडळ" स्थापन केले. या मंडळामध्ये माधव ज्यूलियन, गिरिश, यशवंत, मनोरमा व श्रीधर रानडे, वि. द. घाटे या कवींनी काव्यलेखन केले. मंडळाचे "किरण" नावाचे गद्य पद्यात्मक पुस्तक १९२३ साली प्रसिध्द झाले. पुढे मात्र स्वतंत्र काव्यसंग्रह प्रसिध्द झाले. ६

माधव ज्यूलियन (माधव त्र्यंबक पटवर्धन १८९४-१९३९)

हे रविकिरण मंडळाच्या सदस्यात इतरांपेक्षा वैशिष्टयपूर्ण कामगिरी केलेले कवी होत. त्यांनी काव्यरचनेचे अनेक प्रयोग केले. "विरहतरंग", "सुधारक" उमरखय्यामच्या रूबाया", "द्राक्षकन्या", "गज्जलांजली", "स्वप्नतरंग", "तुटलेले दुवे" "नकुलालंकार", "मधुलहरी" ही त्यांची काव्यनिर्मिती. "विरहतरंग" हे अडतीस श्लोकांचे एक प्रणयमधुर भावकाव्य आहे. सुसंस्कृत मनाच्या यौवनातील पहिल्या बहरातील शुध्द प्रेमाचे वर्णन या काव्यात आहे. प्रेमविषयक अनुभवांचे प्रत्ययपूर्ण चित्रण असे या काव्याबाबत म्हणता येईल. "सुधारक" ही अठरा अध्यायांची, सामाजिक दांभिकतेचा उपहास करणारी काव्यकथा आहे. हे काव्य उपहासात्मक असूनही त्यात आशावादी व जिव्हाळ्याच्या ध्येयवादाचे सूत्र आहे. त्यांनी "उमर खय्यामच्या रूबाया" ची तीन भाषांतरे केली. तसेच " द्राक्षकन्या" व "मधुलहरी" यांचीसुध्दा तशी भाषांतरे केली. "गज्जलांजली" हा त्यांच्या स्फुट कवितांचा पहिला संग्रह. या संग्रहातील कवितांमध्ये प्रणयोपासनेची अलग अलग भावमुद्रा आहे. गज्जलांवरूनच त्यांना 'प्रणयपंढरीचा वारकरी' म्हटले गेले. "तुटलेले दुवे" हा सुनीत संग्रह आहे. तर "नकुलालंकार" हे उपहासपर खंडकाव्य. गझल, सुनीत रूबाया या रचनाप्रकारांचे व शब्दबंधांचे प्रयोग त्यांनी केले.

भावनेची उत्कटता आत्मलेखनाची हौस, अन्यायाची चीड, रचनेचा अर्थदृष्टया व वृत्तदृष्टया साक्षेप, लेखनशैलीतील व्यक्तीविशिष्ट विषमता हे गुण त्यांच्या काव्यात दिसून येतात.

गिरीश (शंकर केशव कानेटकर १८९३-१९७३) यांचे काव्य म्हणजे स्वच्छंदवादी वृत्तीच्या काव्याचा संयमशील व शालीन आविष्कार होय. त्यांनी काव्यगायन करून काव्य लोकप्रिय केले. "वीणाझंकार", "कांचनगंगा", "फलभार", "मानसमेघ", "कांचनमेघ",

"सोनेरी चांदणे", "चंद्रलेखा" हे कवितासंग्रह त्यांनी लिहिले. एक सालस, सज्जन, सहृदय व्यक्तित्व त्यांच्या काव्यातून नजरेस येते. सामाजिक अन्यायाविरुद्ध असंतोषाचे व त्वेषाचे उद्गार त्यांच्या काव्यात आढळतात. आधुनिक मराठी कवितेत सामाजिक विषयावरील खंडकाव्ये लिहिण्याचा पहिला मान गिरिशांचा आहे. "अभागी कमल", "आमराई" ही खंडकाव्ये त्यांनी लिहिली. साधी, प्रासादिक भाषा हे त्यांच्या कवितेचे वैशिष्टय.

यशवंत (यशवंत दिनकर पेंढारकर १८९९- ? ) यांना दुःखाचे शाहीर म्हणतात. समकालीन सुशिक्षित मध्यमवर्गीयांच्या भावभावनांचे प्रतिबिंब त्यांच्या काव्यात आढळते. सामान्य माणसाच्या जीवनातील साध्यासाध्या विषयांवर त्यांनी कविता लिहिल्या. "यशोधन" "यशवंत", "भावबंधन", "यशोनिधी", "यशोगिरी", "यशोगंधा", "पाणपोई", "ओजस्विनी" इत्यादि स्फुट कवितांचे संग्रह तसेच "बंदिशाळा" "जयमंगला", "काव्यकिरीट" ही खंडकाव्ये त्यांनी लिहिली. "छत्रपती शिवराय" हे महाकाव्य लिहिले. यशवंतांची सारी कविता आत्मनिष्ठ आहे. त्यांच्या काव्यात स्वच्छंदी वृत्तीची उत्कटता, गूढता, रम्यता दिसून येते .

सौ. मनोरमा श्रीधर रानडे व श्रीधर बाळकृष्ण रानडे या पतीपत्नींचा " श्री मनोरमा" हा संयुक्त कवितासंग्रह आहे. श्रीधर रानडे यांनी "काळाच्या दाढेतून" हे खंडकाव्य संज्ञाप्रवाही तंत्राने आजारपणाच्या मृत्युछायेतील स्वानुभवातून रचले. त्यांच्या "लेजीम" मध्ये नादमधुर रचना आहे. वि.द. घाटे यांनी "मधुमाधव" या कवितासंग्रहात माधव ज्युलियन

यांच्या बरोबर कविता लिहिल्या. कवी दत्तांचे वि[illegible]ाटे हे चिरंजीव. पुढे त्यांनी गद्य क्षेत्र लिखाणासाठी निवडले.

रविकिरण मंडळाचा काळ हा काव्याच्या व्यवस्थापनाचा व विस्ताराचा काळ होय. याच काळात काव्य गायनाची सुरुवात झाली. गिरीश यांनी काव्यगायन प्रभावीपणे केले. माधव ज्युलियन यांनी "तुटलेले दुवे" मध्ये सुनीतप्रकार संपन्न केला. गिरीश, यशवंत यांनी खंडकाव्ये लिहिली. तसेच माधव ज्युलियन यांनी गझल व रूबाया यांचा प्रसार केला.

रविकिरण मंडळ समकालीन कवी
==========================

काव्यविहारी (धोंडो वासुदेव गद्रे) यांनी १९१५ पासून काव्यलेखनास प्रारंभ केला. "काव्यविहार", "स्फूर्तिलहरी", "स्फूर्तिनिनाद" हे त्यांचे काव्यसंग्रह. त्यांची कविता बाळबोध वळणाची आहे. सामाजिक विषमतेची सावेश चित्रे त्यांनी लिहिली आहेत.

कुंजविहारी (हरिहर गुरुनाथ सलगरकर १८९६) यांचा "गीतगुंजारव" हा काव्यसंग्रह तर ज.शा.देशपांडे यांनी "आहुती" या नावाने त्यांची कविता संपादित केली आहे. त्यांची राष्ट्रीयत्वाची भावना व राष्ट्र भक्ती यांचे दर्शन कवितेतून घडते. कुंजविहारींचे अध्यात्म समाजवादी व पुरोगामी आहे.

या.मु. पाठक यांचे "शशिमोहन" हे खंडकाव्य आहे. जातिरचनेत ओघवत्या शैलीने एक उदात्तभाव काव्यात्म वृत्तीने ते साकार करते.

निशिगंधा (रा.श्री.जोग १९०३-१९७६) यांनी "ज्योत्स्नागीत" व "निशागीत" हे दोन कविता संग्रह लिहिले. त्यांच्या काव्यात सहजसुंदर व बाळबोध प्रणयभावनेचा प्रत्यय येतो.

भा·श्री· पंडित यांचे "पिचलेला पावा","उन्मेष आणि उद्रेक" हे कवितासंग्रह· सांकेतिक पण सापेक्षी, भावपूर्ण पण रेखीव अशी त्यांची कविता आहे·

गोपीनाथ (गोपीनाथ गणेश तळवलकर १९०७) यांनी रवींद्रनाथ टागोरांनी आणलेला जपानी "टांका" मराठीत उतरविला· आधुनिक मराठी काव्येतिहासात लघुकाव्य प्रकारातील "कणिके"साठी ते प्रसिध्द होते· "दूर्वांकुर" हा त्यांचा कवितासंग्रह·

ग·ह·पाटील (१९०६) यांचा "रानजाई" हा प्रसिध्द काव्यसंग्रह· त्यांच्या कवितेचे वैशिष्टय म्हणजे जानपद भाव त्यांनी व्यक्त केले·

ग·ल·ठोकळ (१९०९) यांनी "सुगी" व "मीठभाकर" हे दोन कवितासंग्रह लिहिले· जानपद काव्याचे वेगळे दर्शन त्यांच्या कवितेमधून घडते·

काही स्वतंत्र कवी :-

वामन नारायण देशपांडे (१९०३) यांचे "आराधना" "कोरकू" या संग्रहात त्यांनी मुक्तओवीचा वापर केला आहे· भाषा, छंद विषय यांत वैचित्र्य येण्याइतपत वेगळेपणा त्यांनी काव्यात आणला· ते प्रयोगशील कवी आहेत·

अनंत काणेकर (१९०५) यांचा "चांदरात" हा प्रकाशित काव्यसंग्रह· समाजवादी व प्रगतीशील विचारांचे स्पष्ट पडसाद त्यांच्या काव्यात दिसून येतात· विडंबनपर व विनोदी प्रकारच्या कविताही त्यांनी लिहिल्या·

केशवकुमार (प्रल्हाद केशव अत्रे)१८९८-१९६७) यांचे "गीतगंगा", "झेंडूची फुले" हे कवितासंग्रह आहेत. "गीतगंगा" या कवितासंग्रहावर गोविंदाग्रजांची छाप दिसते. "झेंडूची फुले" या काव्यसंग्रहात विडंबनपर कविता आहे. सांकेतिकतेची कोंडी फोडून काव्यमुक्तीच्या दिशेने त्यांनी काव्यरचना केली.

एका शेतकरी कुटुंबातील निरक्षर स्त्री बहिणाबाई चौधरी (१८४०-१९५१) यांच्या कविता मृत्युनंतर प्रकाशात आल्या. त्यांचे भावविश्व प्रामाणिक व सखोल आहे. त्यांचे तत्वचिंतन जीवनानुभव होऊन पुढे येते.

रविकिरण मंडळ युग काळात काव्याचा विकास व विस्तार झाला असला तरी सांकेतिकतेची कोंडी निर्माण झाली होती. ही कोंडी फोडण्यासाठी नवे प्रयोग झाले. विनोदी कविता, विडंबनपर कविता, सामाजिक भावना व्यक्त करणाऱ्या कविता लिहिल्या.

<u>१९३५-१९४५ काव्यक्रांतीचा पूर्वकाल.</u>

एकोणीसशे पस्तीस ते पंचेचाळीस हे दशक म्हणजे नव्या मर्ढेकरी क्रांतीच्या पूर्वतयारीचे दशक मानले जाते. बोरकर-कुसुमाग्रज-अनिल यांनी मराठी कवितेची कोंडी फोडली व नवकाव्याला दरवाजे उघडून दिले.

अनिल(आ.रा. देशपांडे १९०१) यांचे "फुलवात", "भग्नमूर्ती", "निर्वासित चिनी मुलास", "पेर्ते व्हा", "सांगाती", "दशपदी" हे कवितासंग्रह. "फुलवात"मध्ये प्रामुख्याने प्रेमकविता आहे. 'पेर्ते व्हा' मध्ये प्रेमगीताचे उदात्त रूप दिसून येते. "भग्नमूर्ती", "प्रेम आणि जीवन", "निर्वासित चिनी मुलास" ही मुक्तछंदातील दीर्घकाव्ये त्यांनी लिहिली.

अनिलांच्या कवितेने संकुचित, स्वयंकेंद्री व्यक्तिवादी कविता मागे पडून व्यापक सामाजिक जाणीवेची नवी कविता उदयास आली.

प्रेमानुभूतीचा वेगळेपणा; मुक्तछंदाचे प्रवर्तन व प्रयोग, सामाजिक जाणिवेचा मानवतावाद व आशावाद त्यांच्या काव्यात दिसतो. मुक्तछंदाचे प्रवर्तक म्हणून ते ओळखले जातात.

कुसुमाग्रज (वि.वा.शिरवाडकर - १९१२) यांचे "जीवनलहरी", "विशाखा", "किनारा", "मराठी माती", "स्वगत", "हिमरेषा", "वादळवेल", "रसयात्रा", "मुक्तायन", इत्यादि प्रकाशित कवितासंग्रह आहेत. समाजाच्या सुखदु:खात सहभागी होणारी त्यांची कविता नाट्यगुणयुक्त व स्फोटक आहे. केशवसुत गोविंदाग्रज-तांबे या तीनही कवींच्या कवितांमधील विशेष त्यांच्या काव्यात आढळतात. कुसुमाग्रजांच्या कवितेची बाह्य सजावट जरी रविकिरण मंडळाच्या कवितेशी नाते सांगणारी असली तरी गाभा मात्र केशवसुती आशयाशी अनुबंध सांगणारा आहे. त्यांनी रचनेचे विविध प्रयोग केले.

बा.भ.बोरकर (१९१०) यांचे "चित्रवीणा", "गितार", "चैत्रपुनव", "प्रतिभा", "जीवनसंगीत", "दूधसागर", "आनंदभैरवी" इत्यादि काव्यसंग्रह आहेत. तृप्त प्रेमानुभव व निसर्गसौंदर्याचा आविष्कार हे त्यांच्या काव्याचे महत्त्वाचे घटक आहेत. गेयता हा त्यांच्या काव्याचा एक गुण आहे. उत्कट भावना, कल्पनेची तरलता, नादमयता, श्रद्धायुक्त जीवननिष्ठा, हे त्यांच्या कवितेचे आणखी काही विशेष आहेत. त्यांचे संवेदनाशील मन गांधीजी व रवींद्रनाथ टागोर अशा महापुरुषांची शब्दचित्रे रेखाटते. रोमँटिक वृत्तीचा सौंदर्यपूर्ण आविष्कार त्यांच्या कवितेतून घडतो.

वा.रा.कान्त (१९१३) यांचे "पहाटवारा", "फटकार", "रुद्रवीणा", "वेलांटी", "वाजली विजेची टाळी", हे काव्यसंग्रह. तर "अग्निपथ", "अभिसार", "अंधार सूर्याने पाहिलेला" ही दीर्घकाव्ये

प्रसिध्द आहेत. रविकिरण मंडळ व तांबे यांच्या गीति - संप्रदायातून प्रेरणा घेऊन "पहाटवारा", "फटकार" मध्ये त्यांनी रचना केली. त्यांच्या कवितेचे स्वरूप पुढील कवितासंग्रहामध्ये बदललेले आहे. त्यांच्या कवितेत उग्रता व दाहकता दिसून येते.

रा. अ. काळे (१९०७) यांनी नवकाव्याच्या दिशेने वाटचाल करतांना मुक्तछंद स्विकारला. "वाग्दत्त", "ओळीचे सूर", "भावपूर्णा", "गीतनिर्वाण", हे त्यांचे प्रकाशित काव्यसंग्रह. सुबोधपणा हा त्यांच्या काव्यशैलीचा एक विशेष आहे.

सोपानदेव चौधरी (१९०७) यांचे "काव्यकेतकी", "अनुपमा" हे कवितासंग्रह तर "सोपानदेवी" हा निवडक कवितांचा संग्रह आहे. ते स्वत: उत्तम रीतीने कविता गात असल्यामुळे ते श्रोतृप्रिय होते. त्यांच्या कवितेवर रविकिरण मंडळाच्या कवितेची छाप आहे.

सुधांशु (ह. न. जोशी ? ) यांचे "भावसुधा", "गीत दत्तात्रेय", "भरली चंद्रभागा" इत्यादी काव्य संग्रह प्रसिध्द आहेत. त्यांनी दत्तावर कांही गीते रचली आहेत. त्यापैकी "दत्त दिगंबर दैवत माझे",
१ "इथेच या बांधावर" "दत्तगुरु पाहिले कृष्णातीरी" ही गीते विशेष लोकप्रिय झाली. दलितांबद्दल सहानुभूती व मंगलतेची उपासना यांच्या जोडीला कौटुंबिक, शालीन प्रेमभाव त्यांच्या कवितांमधून व्यक्त होतो.

ना. घ. देशपांडे (१९०९) यांचे "शीळ", "अभिसार" हे काव्यसंग्रह प्रसिध्द आहेत. त्यांच्या कवितेने नवकाव्याकडून प्रतिमा, मुक्तछंद यांचा स्विकार केला आहे. परंतु सौंदर्यवादाचा त्याग तिने केलेला नाही. "अभिसार" मध्ये कवीला वास्तवाचे भान झाल्याचे जाणवते.

मनमोहनांच्या (गो.न.नातू १९११) काव्यात विविधता आहे. "कॉलेजियन", "सुनीतगंगा", " युगायुगांचे सहप्रवासी", हे त्यांचे कविता संग्रह. "कॉलेजियन" वर माधव ज्यूलियन यांच्या "विरहतरंग" मधील - कवितांची छाया आहे. "युगायुगांचे सहप्रवासी" मध्ये हिंदू -मुस्लीम संघर्षाचा विषय आहे. त्यांच्या काव्यात अतिशयोक्ती, पुनरूक्ती हे दोष दिसून येतात.

संजीवनी (सौ. संजीवनी मराठे १९१६) यांनी अकराव्या - बाराव्या वर्षी कविता रचायला सुरूवात केली. "काव्य संजीवनी", "राका" "संसार", "छाया" हे त्यांचे प्रकाशित कवितासंग्रह. संजीवनी यांच्या काव्यातून शालीन प्रणय, वात्सल्य, श्रध्दा आणि सौंदर्य या सारख्या भावना व्यक्त होतात. सुरूवातीच्या कवितांमध्ये आढळणारी सांकेतिकता पुढे कमी झाली. रवींद्रनाथ टागोरांच्या रहस्यवादी कवितांचा प्रभाव त्यांच्या काव्यावर आहे.

पद्मा (पद्मावती विष्णू गोळे १९१३) यांचे "प्रीतीपथावर", "नीहार", "स्वप्नजा", "आकाशवेडी", "श्रावणमेघ" हे काव्यसंग्रह प्रसिध्द आहेत. त्यांचा स्वतंत्रपणे अभ्यास करावयाचा असल्याने येथे फक्त नामनिर्देश केला आहे.

श्रीकृष्ण पोवळे (१९२०-१९७५) यांचे "अग्निपराग", "जळमाती", हे काव्यसंग्रह प्रसिध्द आहेत. "अग्निपराग" मधील कवितांमध्ये क्रांतीचा आवेश, सामाजिक विषमतेच्या अन्यायाविरूध्द चीड व वैयक्तिक प्रणयान- नुभूती हे विशेष दिसून येतात. गांधीजींच्या मृत्यूनंतर त्यांनी लेखन बंद केले. उमर खय्यामच्या नास्तिकवादाचा प्रभाव त्यांच्या काव्यात दिसतो.

कृ.ब.निकुंब (१९२०) यांनी "उज्वला", "उर्मिला", "अनुबंध", "अभ्र", "मृगावर्त", हे काव्यसंग्रह लिहिले. निकुंबांनी मुक्तछंदाचाही वापर केला.

वि.म. कुलकर्णी (१९१०) यांनी "विसर्जन" हे खंडकाव्य तर "पहाटवारा", "कमळवेल", "अश्विनी" हे स्फुट कवितासंग्रह लिहिले. गीतरामायणापासून प्रेरणा घेऊन "प्रसादरामायण" त्यांनी लिहिले. वि.म. कुलकर्णींनी मध्यमवर्गीय कौटुंबिक जीवनातील लहान सहान प्रसंगांमधून भावमधुर व कारुण्यपूर्ण अशी चित्रे उभी केली आहेत.

बी. रघुनाथ यांचे "आलाप" आणि "विलाप", "पुन्हा नभाच्या लाल कडा" हे काव्यसंग्रह प्रसिध्द आहेत. त्यांची कविता म्हणजे एक संवेदनशील, धीट व उत्कट प्रणयानुभूतीचा रसाळ आविष्कार होय.

ग.दि. माडगूळकर यांचे "गीतरामायण" अतिशय लोकप्रिय झाले. "सुगंधी वीणा", "जोगिया", "चैत्रबन" हे त्यांचे प्रकाशित काव्यसंग्रह. त्यांच्या रचनेमध्ये अत्यंत सहजता, प्रसन्नता व भावपूर्णता आहे.

शांता शेळके यांनी "गोंदण", "वर्षा", "तोच चंद्रमा", "रूपसी" इत्यादि कविता संग्रह लिहिले आहेत. "वर्षा" मधील कविता ही स्वप्नाळू वृत्तीची आहे. तर "रूपसी" वर रविकिरण मंडळींच्या कवितेची छाप आहे. अनुभूतीच्या मोकळेपणाने व साधेपणाने त्यांनी कविता लिहिली.

ना.ग.जोशी (१९११) यांनी "जीवनयोग", हे खंडकाव्य तर "विश्वमानव" हे दीर्घकाव्य लिहिले. "कविता" हा त्यांचा भावगीत संग्रह आहे. मानवतावादी वैचारिक निबंधकाव्य लिहिण्याची कवी अनिलांची

परंपरा त्यांनी पुढे चालविली. मुक्तछंदाचा त्यांनी वापर केला.

एकोणिसशे पस्तीस ते पंचेचाळीस हा काळ म्हणजे नव्या मर्ढेकरी क्रांतीच्या पूर्वतयारीचे युग मानले जाते. अनिलांनी मुक्तछंदाच्या प्रवर्तनाने व आंतरराष्ट्रीय मानवतावादाने तर कुसुमाग्रजांनी वस्तुनिष्ठ सामाजिक जाणिवांच्या प्रखर अभिव्यक्तीने, बोरकरांनी अनोख्या सुंदर प्रतिमा सृष्टीने मराठी कवितेमध्ये निर्माण झालेली सांकेतिकतेची कोंडी फोडली व नवकाव्याला दरवाजे उघडे केले.

मराठी कवितेचा पाचवा कालखंड (१९४६-१९६०)
========================== =========

वास्तवाच्या दोन प्रतिक्रिया मराठी कवितेत उमटल्या. एक मर्ढेकरांची विफलतावादी व दुसरी मुक्तिबोधांची आशावादी विद्रुपते-विरुद्ध दोघांचाही विद्रोह होता.

नवकाव्याचे पहिले प्रवर्तन :-
====================

बाळ सीताराम मर्ढेकर (१९०९-१९५६) यांना दुसरे केशवसुत म्हणतात. त्यांच्या "शिशिरागम" या पहिल्या कविता-संग्रहावर विशेषकरून माधव ज्यूलियन व बालकवी यांचा प्रभाव दिसून येतो. इंग्लंडला जाऊन आल्यानंतर त्यांच्या कवितेत आमूलाग्र बदल झाला. साम्राज्यवाद आणि भांडवलशाही, त्यांचे दुष्परिणाम, त्यामुळे सामाजिक व वैयक्तिक जीवनात येणारी लाचारी, स्वार्थ आणि ढोंग, यंत्रयुगामुळे आलेली कृत्रिमता, यांत्रिकता व अमानुषपणा. महायुद्धाने घडविलेले विज्ञानाचे दुष्परिणाम. ही सगळी विटंबना मर्ढेकरांनी आपल्या डोळ्यांनी पाहिली आणि आपली प्रतिक्रिया अत्यंत उपरोधाने, उपहासाने ~~अतिशय~~

आणि कारुण्याने व्यक्त केली. विदारक वास्तवाची भेसूर जाणीव मर्ढेकरांना अस्तित्व चिंतनापाशी नेऊन ठेवते. मानवी जीवनाची अर्थशून्यता त्यांना आतपर्यंत जाणवते. त्यांची "काही कविता" व "आणखी काही कविता" या दोन काव्यसंग्रहांनी मराठी कवितेत पुन्हा एकदा युगांतर घडवून आणले.

मर्ढेकरांनी नव्या विज्ञान युगातील उपमाने आणली. प्रतिमांची नवी सृष्टी त्यांनी रचली. ओवी, अभंग, पादाकुलक या छंदातून त्यांनी आपली कविता लिहिली.

शरच्चंद्र मुक्तिबोध (१९२१) यांचे "नवी मळवाट" व "यात्रिक" हे प्रकाशित कविता संग्रह आहेत. प्रगतीशील विचार, आशावाद सामाजिक जाणीव त्यांच्या कवितेत दिसते. मुक्तीबोधांची सामाजिक जाणीव विरोधविकासाधिष्ठित मार्क्सवादी सिद्धांताचे खुलेपणाने समर्थन करणारी आहे. व्यक्तिवादी मानवतावादापेक्षा समष्टीवादी मानवतावाद मानणारी त्यांची कविता आहे. जनशक्तीवरील विश्वास, समष्टीची आंतरिक चेतना, वास्तवाची जाण व समतेची आस या सर्वांमधून समाजवादी सिद्धांत आणि प्रचलित समाजव्यवस्थेच्या विद्रुपाविरुद्ध विद्रोह पेटून उठतो. या सर्वांचे प्रतिबिंब आपणास त्यांच्या कवितेत दिसते.

पु.शि.रेगे (१९१०) यांचे "साधना", "फुलोरा, "हिमसेक", "दोला", "गंधरेखा", "पुष्कळा", "प्रियाळ", "दुसरा पक्षी" हे कवितासंग्रह आहेत. शुद्ध कलावादी संवेदनांची जाणीव व्यक्त करणारी कविता रेगे यांनी लिहिली. त्यांच्या कवितेचा स्थायीभाव रती हा आहे. स्त्रीची विविध रूपे व शृंगाराच्या विविध छटा त्यांच्या कवितेत दिसतात. संस्कृत शब्द रचनेने त्यांच्या काव्यास वेगळे सौंदर्य प्राप्त झाले आहे.

काही नवकवी :-

वसंत हजरनीस (१९४१) यांचा "वश्या म्हणे" हा सव्वीस कवितांचा संग्रह आहे. यावर मर्ढेकरांचा प्रभाव जाणवतो.

गं.ब.ग्रामोपाध्ये यांचा फक्त पंचवीस कवितांचा "निळावंती" हा काव्यसंग्रह प्रकाशित आहे. या संग्रहातील कवितांना वास्तवाचे भान आहे. मुक्तछंदात त्यांनी कविता लिहिल्या आहेत.

य.द.भावे (१९११) यांचे "आर्द्रा", "हळवे भिंग" हे दोन कवितासंग्रह प्रसिध्द आहेत. "मीलन" हे दीर्घकाव्य त्यांनी लिहिले आहे.

नवकाव्याचे दुसरे प्रवर्तन :-

विंदा करंदीकर (१९१८) यांचे "स्वेदगंगा", "मृद्गंधा", "धृपद" "जातक" इत्यादि कवितासंग्रह. आधुनिक मराठी कवितेतील सर्वाधिक प्रयोगशील कवी म्हणून करंदीकरांचे नाव घेतले जाते. जाणीवा आणि अभिव्यक्ती या संदर्भात मुक्त स्विकारशील वृत्ती त्यांच्या काव्यात आढळते. इंद्रियनिष्ठा हा करंदीकरांच्या कवितेचा विशेष आहे. त्यांच्या सृजनोत्सुक प्रयोगशीलतेने मराठी कवितेचा प्रवाह विस्तृत केला व तिची खोलीही वाढविली.

वसंत बापट (१९२२) यांचे "बिजली", "सेतू", "अकरावी दिशा", इत्यादि काव्यसंग्रह प्रकाशित आहेत. प्रेमातील उत्कटता, उत्कट सामाजिक जाणीव, गेयता ही त्यांच्या काव्यलेखनाची वैशिष्ट्ये आहेत. "वय वर्षे सोळा", "रंगाने तू गव्हाळ" या लावण्या त्यांनी लिहिल्या. शृंगाराच्या वेगवेगळ्या छटा त्यांच्या कवितांमध्ये आढळून

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

येतात. त्यांचे राष्ट्रवादी काव्यही सरस आहे.

मंगेश पाडगांवकर (१९२९) यांनी "धारानृत्य", "जिप्सी", " "उत्सव", "छोरी", "वात्रटिका" हे कवितासंग्रह लिहिले. काव्य-वाचन करून पाडगांवकरांनी काव्य वाचनाचे प्रयोग लोकप्रिय केले. त्यांच्या कवितांमध्ये संगितानुकूल शब्दमाधुर्य आहे. "वात्रटिका" त्यांनी लिहिल्या. वात्रटिकांमधून त्यांनी सामाजिक दोषांवर बोट ठेवले.

इंदिरा संत (१९१४) यांचे "सहवास" (ना.मा.संत व इंदिरा संत - एकत्रित) "शेला", "मेंदी", "मृगजळ", "रंगबावरी" "बाहुल्या" इत्यादि प्रकाशित कवितासंग्रह आहेत. विशुध्द भावकविता लिहिणा-या कवयित्री म्हणून त्या ओळखल्या जातात. इंदिरा संतांची कविता आत्मकेंद्री आहे. त्यांच्या कवितेतून प्राधान्याने विरहभावनेच्या विविध छटा व्यक्त झाल्या आहेत.

नवकाव्याचे तिसरे प्रवर्तन :-
====================

सदानंद रेगे (१९२४) यांचे "देवापुढचा दिवा", "अक्षरवेल", "गंधर्व" हे प्रकाशित कवितासंग्रह आहेत. त्यांची कविता समकालीनांपेक्षा वेगळे-पण जपणारी आहे. त्यांची कविता प्रतिमा, फॅंटसी व मिताक्षरी शैली यामुळे एक वेगळाच ठसा उमटवते. नवकाव्याचा एक विशिष्ट रचनाप्रकार "किंचित काव्य" त्यांनी समर्थपणे हाताळला.

आरतीप्रभू (चि.त्र्यं.खानोलकर १९७६) यांनी "जोगवा", "दिवेलागण", "नक्षत्रांचे देणे" हे कवितासंग्रह लिहिले. त्यांच्या कवितेत कोकणाचे अनेक संदर्भ येतात. परिचित प्रतिमांना एक अनोखे चैतन्य देऊन

त्यांची कविता जीवनाचा एक तरल पण प्रगल्भ प्रत्यय देत राहते.

दिलीप चित्रे यांचे "कविता", "कवितेनंतरच्या कविता", "एकूण कविता" इत्यादि कविता संग्रह प्रसिध्द आहेत. त्यांनी गझल, गीत, सुनीत हे काव्यप्रकार हाताळले. "शक्ती स्त्रोत" ही त्यांची दीर्घ चिंतनशील कविता आहे.

साठोत्तरी मराठी कविता :-
=======================

साठोत्तरी मराठी कवितेत प्रामुख्याने अनियतकालिकांची चळवळ दलित साहित्य, ग्रामीण साहित्य हे प्रवाह दिसून येतात. साठोत्तरी कविता अरुण कोलटकर, भालचंद्र नेमाडे, वसंत आबाजी डहाके, नामदेव ढसाळ, नारायण सुर्वे, दया पवार, इत्यादींनी विकसित केली. दर दहा वर्षांनी कवींची एक नवी पिढी येते हे प्रा. रा.श्री.जोग यांच्या विधानाची सत्यता आपणास पटते.

अरुण कोल्हटकर यांच्या कविता "अरुण कोलटकरांच्या कविता" या संग्रहात एकत्रितपणे आहेत. त्यांच्या कविता "सत्यकथा", "छंद" "शब्द", "अथर्व" "असो" ह्या नियतकालिकांमधून व अनियतकालिकांमधून प्रकाशित झाल्या. त्यांनी "जेजुरी" ही इंग्रजीत दीर्घ कविता लिहिली. कोलटकरांच्या कवितेमध्ये महानगरी वास्तवाचे चित्रण आढळते. त्यांची प्रतिमासृष्टी समकालीन मराठी कवितेत वेगळी उठून दिसणारी आहे. कोलटकरांनी आपल्या कवितेत भाषेचा अव्याकरणीय उपयोग केला आहे.

भालचंद्र नेमाडे यांचे "मेलडी", "देखणी" हे कवितासंग्रह प्रसिध्द आहेत. विश्वाच्या पसाऱ्यातील संगतीहीनता, तर्कहीनता हाच त्यांच्या कवितांचा मुख्य आशय आहे.

वसंत आबाजी डहाके यांची "योगभ्रष्ट" व "शुभवर्तमान" या कविता संग्रहात कविता पहावयास मिळते. वर्तमानकाळातील वास्तवात जगताना सर्वसामान्य माणसांची होणारी घुसमट व जगाच्या पसाऱ्यात त्याला जाणवणारी अर्थहीनता आणि त्यातून निर्माण होणारे प्रश्न त्यांच्या कवितेत आढळून येतात.

ना.धों. महानोर यांची कविता ही उत्कट भावकविता आहे. "रानातल्या कविता", "वही" इत्यादी त्यांचे कविता संग्रह आहेत. त्यांची कविता ग्रामीण जीवनाशी निगडीत आहे. बोलीभाषेच्या शब्दांची सहज योजना व लय हे त्यांच्या कवितेचे वैशिष्टय आहे.

नामदेव ढसाळ यांच्या कवितेत दलित जाणिवेचा प्रभावी आविष्कार आहे. "गोलपीठा", "मूर्ख म्हाताऱ्याने डोंगर हलविले", "तूही इयत्ता कंची", "खेळ" हे त्यांचे कवितासंग्रह प्रसिध्द आहेत. मार्क्सवादी व आंबेडकरवादी जाणिवा त्यांच्या कवितेत आहेत. महानगरी जीवनाचे दर्शनही त्यांच्या कवितेत घडते. दारिद्र्य, अन्याय, लाचारी यांचे वर्णन त्यांच्या कवितेत आहे.

नारायण सुर्वे हे साठोत्तरी मराठी कवितेत विद्रोह मांडणारे पण त्याच बरोबर संयमी कवी आहेत. त्यांचे "ऐसा गा मी ब्रह्म", "माझे विद्यापीठ", "जाहीरनामा", "सनद" इत्यादी कवितासंग्रह प्रसिध्द आहेत. त्यांच्या कवितेमध्ये श्रमजीवींच्या व्यथा मांडलेल्या आहेत. त्याच बरोबर अन्यायाबद्दल चीडसुध्दा व्यक्त झाली आहे. सुर्वे यांच्या कवितेने कवितेचे पूर्वापार संकेत मोडले. वास्तववादी अशी त्यांची कविता आहे. सुर्वे यांच्या कवितेच्या प्रेरणा मार्क्सवादी व आंबेडकरवादी आहेत. चातुर्वर्ण्याची चौकट व त्यामुळे दलित वर्गाची होणारी ससेहोलपट त्यांनी आपल्या कवितेतून व्यक्त केली

आहे. तसेच नव्या युगात हे सर्व बदलेल असा आशावादही त्यांनी मांडला आहे.

दया पवार यांनी "कोंडवाडा" हा कवितासंग्रह लिहिला. त्यांनी समाजव्यवस्थेला नाकारले आहे. दया पवारांची कविता ही वाचकाला अंतर्मुख करणारी कविता आहे.

साठोत्तरी कवितेत ना.धों. महानोरांची वेगळ्या शैलीत ग्रामीण कविता अवतरली तर नामदेव ढसाळ, दया पवार, नारायण सुर्वे या दलित कवींची मार्क्सवादी व आंबेडकरप्रणित विचारांची कविता आली. अरुण कोलटकर, वसंत आबाजी डहाके यांनी महानगरी वास्तवाचे दर्शन घडविणारी कविता लिहिली. अशा प्रकारे मराठी काव्यप्रवाह विविध अंगांनी समृद्ध झाला. या संदर्भात प्रा. रवींद्र घवी यांचे पुढील विधान अर्थपूर्ण आहे. " या काळात सातशेच्यावर कवींचे दीड हजारावर कवितासंग्रह प्रसिद्ध झाल्याचे दिसून येते. संख्यात्मक दृष्टीने विचार केल्यास या काळात मराठी कवितेला जेवढा बहर आलेला दिसते तेवढा त्यापूर्वीच्या कोणत्याही काळात आलेला नव्हता. या समग्र कवितेकडे नजर टाकली तरी एक गोष्ट जाणवते की, मराठी समीक्षेत "नवकविते"वर किंवा अद्यावत अस्तित्ववादी प्रवृत्तींवर कितीही चर्चा चालू असो, विद्यापीठ पातळीवर त्यावर कितीही अध्ययन चालू असो, बहुसंख्य कवी आजही जुन्या कवितेच्या धारेतच वावरत आहेत. अलंकारप्रचुर, गीतात्मक, निवेदनात्मक, वक्तृत्वपूर्ण, सुबोध काव्यरचनाच विपुल प्रमाणात प्रसिद्ध होत आहेत". (३)

आतापर्यंतच्या आपल्या विवेचनावरून खालील निरीक्षणे नोंदवता येतील.

१) अर्वाचीन मराठी कवितेच्या आरंभकाळात संस्कृत इंग्रजी काव्याची भाषांतरे झाली. त्याचप्रमाणे या काळात नव्या काव्यरचनाही झाल्या.

२) इ.स.१८७६ ते इ.स.१८८५ या काळातील कविता ही क्रांतिपूर्व काळातील कविता म्हणून ओळखली जाते. या काळात आशय व अभिव्यक्ती क्षेत्रात बदल झाला.

३) इ.स.१८८६ ते इ.स. १९०५ व इ.स. १९०६ ते १९२० या कालखंडावर केशवसुत व त्यांचा संप्रदाय याचा प्रभाव दिसतो.

४) चौथ्या कालखंडात रविकिरण मंडळाच्या कवितेने मराठी कवितेचे पात्र विस्तारले. पुढील कालखंडात नवकाव्याची मर्ढेकर, विंदा करंदीकर व सदानंद रेगे अशी तीन प्रमुख प्रवर्तने दिसून येतात.

५) साठोत्तरी कवितेत अनियतकालिकांच्या चळवळीतील काव्य, दलित काव्य, ग्रामीण काव्य हे प्रमुख प्रवाह दिसतात.

आधुनिक मराठी कवितेची वाटचाल पाहिल्यानंतर आता पुढील प्रकरणात "पद्मा गोळे : व्यक्ती व वाङ्मय" याचा विचार करणे योजिले आहे.

## प्रकरण पहिले : संदर्भ


१)(प्रकाशक) - कुलकर्णी अनंत अंबादास,
लेखक - जोग रा.श्री. "प्रदक्षिणा" → लेखकाचे नाव प्रथम लिहावे.
खंड पहिला, काव्य लेख समाविष्ट. पुणे १९७२.
पृष्ठ १.

२) ठकार निशिकांत " मराठी कविता: स्वरूप आणि विवेचन"
पुणे १९७७, पृ. २१७, २१८.

३) (प्रकाशक) - कुलकर्णी अनंत अंबादास.
लेखक - रवींद्र पवी "प्रदक्षिणा", → लेखकाचे नाव ?
खंड दुसरा, काव्य लेख समाविष्ट.
पुणे, १९९१.
पृ.९.


xxxxx